| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br>**प्रेसनोट** | CB/47/2025 |
| गुन्हे शाखा, नवी मुंबई | | दिनांक ११/०८/२०२५ |

-----------------------------------------------------------------------------------------------

**"नवी मुंबई, मुंबई, ठाणे, कल्याण, अंबरनाथ येथुन मोबाईल कंपन्यांच्या टॉवरमधील बॅटरी चोरी करणा-या आरोपींना गुन्हे शाखा, कक्ष २, पनवेल कडुन अटक करून १० गुन्हे उघड"**

-----------------------------------------------------------------------------------------------

दि.२७/०७/२०२५ रोजी उलवा पोलीस ठाणे, नवी मुंबई पोलीस ठाणे हद्दीतील मोबाईल कंपनीच्या टॉवरमधील बॅटरी चोरीचा गुन्हा ३९/२०२५ अन्वये उलवा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे.

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री.संजय ऐनपुरे, सह.पोलीस आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी मोबाईल कंपन्यांच्या टॉवरमधील बॅटरी चोरीच्या गुन्हयांना आळा घालणेकामी व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा, कक्ष २, पनवेल चे वपोनि, उमेश गवळी यांनी विषेश पथक स्थापन केले.

सदर गुन्हयाच्या घटनास्थळी कोणताही पुरावा व साक्षीदार उपलब्ध नसताना केलेल्या कौशल्यपुर्ण तांत्रिक तपासाव्दारे प्राप्त माहितीवरून सदरचा गुन्हा हा हुसैन मोहम्मद सय्यद, वय ३२ वर्षे, रा. बैंगणवाडी याने त्याच्या साथीदारांसह केल्याचे निष्पन्न झाले.

सबब आरोपी - (१)हुसैन मोहम्मद सय्यद, वय ३२ वर्षे, रा.बैगणवाडी, रोड नं १४, रूम नं १८, महानगरपालिका शाळा नंबर ३ जवळ, फैजानेरजा मस्जीद, शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई. (२)मोहम्मद मुख्तार इज्राईल मलिक, वय ३६ वर्षे, रा.प्लॉट नं ४३, रूम नं २२, रोड नं ०५, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई यांचेकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात त्यांनी नवी मुंबई, मुंबई, ठाणे, कल्याण, अंबरनाथ परीसरात अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे कबुली दिली. आरोपींकडून मोबाईल कंपनीच्या टॉवरमधील बॅट-यांचे खालील प्रमाणे एकूण १० गुन्हे उघडकीस आणले आहेत. तसेच सदर आरोपींना पुढील कारवाईकामी उलवा पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. अटक आरोपींची दि.१३/०८/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १) | उलवा पोलीस ठाणे, नवी मुंबई. | ३९/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२). |
| २) | उरण पोलीस ठाणे, नवी मुंबई. | २०२/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०३(२). |

| | | |
|---|---|---|
| ३) | पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई. | ४४९/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२). |
| ४) | खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई. | २२५/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२). |
| ५) | हिललाईन पोलीस ठाणे, जि.ठाणे. | ३६/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२). |
| ६) | डोंबीवली पोलीस ठाणे, जि.ठाणे | ६०८/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०३(२). |
| ७) | मानपाडा पोलीस ठाणे, जि.ठाणे | ८९१/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२). |
| ८) | कल्याण तालुका पोलीस ठाणे, जि.ठाणे. | ३२४/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२). |
| ९) | महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, जि.ठाणे. | ४२५/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२). |
| १०) | भांडुप पोलीस ठाणे, मुंबई. | ४३२/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२). |

सदरची उल्लेखनीय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उमेश गवळी यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि अभयसिंह शिंदे, माधव इंगळे, सफौ. अनिल पाटील, पोहवा/प्रशांत काटकर, रमेश शिंदे, प्रमोद राजपुत, अजित पाटील, निलेश पाटील, सागर रसाळ, दिपक डोंगरे, इंद्रजित कानु, रूपेश पाटील, मपोहवा/ हिरकणी पवार, पोना/आजिनाथ फुंदे, मपोना/विनया पाटील, पोशि/लवंकुश शिंगाडे, विक्रांत माळी, प्रसाद घरत यांनी केलेली आहे.

★★★★★★★★★★